<u>नि.क. ०७ पुढे</u>

<u>सं.फौ.ख.कं. १३५/२०२०</u> सरकार -वि- कमलेश वगैरे

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क. २ची जबानी**

**मी याव्द्‌ारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**
माझे नाव : लहु विठठल ठोकळ
वय :- ३८ वर्षे, पद :-रेंज फॉरेस्ट ऑफीसर,
नेमणुक :- पवनी(वाईल्ड लाईफ) तालुका उमरेड, जिल्हा भंडारा.

**<u>साक्षदाराची सरतपासणी सरकारतर्फे कु.बी.जी.पांडे सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. दि.१३.११.२०१९ रोजी मी वनपरीक्षेत्र बुटटीबोरी येथे कार्यरत होतो. त्यावेळेस , मांडुळ जातीचा साप कोणीतरी व्यक्ती मोटारसायकले पकडुन नेत असल्याचा व्हीडीओ व्हायरल झाला होता. त्या व्हीडीओवरून मी गाडीचा नंबर प्राप्त करून घेतला त्या गाडीचा कं.एमएच-४०-डी-४७१० असा होता. आरटीओ नागपुर युांच्याकडुन गाडीबाबत माहिती प्राप्त करून घेतली. ती गाडी विनोद नावाच्या व्यक्तीच्या नावावर असल्याचे समजले. त्या व्यक्तीला विचारपुस केली असता समजले की, त्याने ती गाडी काशीनाथ ठाकरे यांना दहा वर्षापुर्वी विकली आहे. त्यानंतर रात्री ११.०० वाजताच्या दरम्यान मी माझया इतर स्टाफसह काशीनाथ ठाकरे याच्या घरी गेलो. त्यानंतर मी गाडीच्या मालकी विषयी चौकशी केली. गाडी काशीनाथ ठाकरे याच्याकडुन विकत घेतल्याचे समजले. त्यावेळी आरोपी कमलेश सुध्दा तेथे हजर होता. आरोपी कमलेश याला विचारपुस केली असता त्याने मांडुळ जातीचा साप आरोपी मनीष याच्यासह पकडल्याचे कबुल केले. त्यानंतर कमलेशने दिलेल्या माहितीवरून आम्ही आरोपी मनीष याच्या घरी गेलो. दोन्ही आरोपींनी मांडुळ जातीचा साप एमआयडीसी गेट कं.३ पार्कींग मध्ये एका बंद खोलीमध्ये असल्याचे सांगितले. आम्ही दोन्ही आरोपींसह घटनास्थळावर गेलो. खोलीला लॉक असल्यामुळे लॉक तोडला. तेव्हा एका प्लॅस्टीक पिशवीमध्ये मांडुळ जातीचा साप बंद करून ठेवलेला होता. खरडयाच्या डब्यात मांडुळ जातीच्या सापाला ठेवण्यात आले. नियमाप्रमाणे सापाला नैसर्गीक अधिवासात सोडण्यात आले. आरोपींना अटक केली. वनरक्षक अंकुश नागरकोजे यांनी गुन्हा दाखल केला. गुन्हयाचा तपास करून मी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. मी आरोपींना ओळखतो ते आज न्यायालयत हजर नाहीत.

**<u>साक्षदाराचा उलटतपास आरोपीतर्फे श्री घांगरेकर वकील</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की मला घटनेबाबत काहीही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी चुकीचा तपास करुन दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवीले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी

साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत,

(एस.एस.ओसवाल)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,
हिंगणा
दि.१२.१०.२०२२

माझे समक्ष,

(एस.एस.ओसवाल)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,
हिंगणा
दि.१२.१०.२०२२